# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Lokmat

Dated: 26/7/2009

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ आज

नागपूर, दि.२४(प्रतिनिधी) - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ९६ व्या दीक्षांत समारंभाचे आयोजन उद्या, शनिवारी करण्यात आले आहे. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या समारंभात ५७ हजार ७२ विद्यार्थ्यांना स्नातक आणि स्नातकोत्तर पदव्या विद्यापीठाचे कुलपती आणि राज्यपाल एस.सी.जमीर प्रदान करतील. नियोजन आयोगाचे सदस्य डॉ.नरेंद्र जाधव दीक्षांत समारंभाचे विशेष अतिथी असतील. कुलगुरू डॉ.श.नू.पठाण यांनी शुक्रवारी ही माहिती दिली.

विधी स्नातक परीक्षेत (पाच वर्षे) सर्वाधिक गुण मिळविणारी विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची नेहा मिथीलेश चौबे यंदाच्या दीक्षांत समारंभाचे विशेष आकर्षण आहे. दहा सुवर्ण, दोन रौप्य आणि विशेष पारितोषिक अशा १४ पुरस्काराने नेहाचा कुलपतींच्या हस्ते गौरव करण्यात येईल.

- **नेहा चौबेला सर्वाधिक पदके**
- **सपना तिरपुडे आणि पूजा पिंगळेचाही गौरव**
- **जोत्स्ना पांडेना मरणोत्तर पीएच.डी.**

जोत्स्ना मिलिंद पांडे यांना वाङ्मय विद्याशाखेत मरणोत्तर पीएच.डी. यावेळी बहाल करण्यात येईल. २००६ मध्ये जोत्स्ना यांनी हिंदी विषयात शोधप्रबंध सादर केला होता. त्यांचे एप्रिल २००७ मध्ये निधन झाले.

विधी स्नातक (तीन वर्षे) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारी सपना ताराचंद तिरपुडे एकूण ■ पान २ वर

## २६/११ अन् श्रीधरनची पीएच.डी.

भारतीय सैन्य दलातील जी.श्रीधरन यांना वाणिज्य शाखेतील पीएच.डी. कुलपतींच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. मुंबईतील २६/११ च्या हल्ल्यानंतर देशभरातील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली होती. याच दरम्यान श्रीधरन यांनी सादर केलेल्या शोधप्रबंधावर विद्यापीठात मौखिक परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी यापूर्वीही मौखिक परीक्षा दिली होती. दुसऱ्या वेळी त्यांना रजा न मिळाल्याने ते नागपुरात येऊ शकले नव्हते. मात्र श्रीधरन यांचा शोधप्रबंध विचारात घेत विद्यापीठाने त्यांना पीएच.डी.देण्याचा निर्णय घेतला होता.

# प्रतिभेच्या बळावर जग जिंका - डॉ. नरेंद्र जाधव

**नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी)** : 'येरे येरे पावसा' म्हटल्याने पाऊस कधीच पडत नाही आणि पडणार नाही! पावसाला खोटा पैसा देण्याचे आश्वासन देणारे बडबडगीत गात बसाल तर देशाला सुपर पॉवर होण्यासाठी शतके लागतील. प्रगल्भ इच्छाशक्तीच्या बळावर जग जिंकण्याचा मंत्र नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी तरुणाईला दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ९६ वा दीक्षान्त समारंभ शनिवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. डॉ. जाधव यांनी यशाची अष्टसूत्री विद्यार्थ्यांना यावेळी सांगितली.

विद्यापीठाचे कुलपती आणि राज्यपाल एस.सी. जमीर यांच्या हस्ते २००८ च्या परीक्षेतील ५७ हजार ७२ विद्यार्थ्यांना स्नातक आणि स्नातकोत्तर पदव्या

## नागपूर विद्यापीठाचा ९६ वा दीक्षान्त समारंभ

यावेळी प्रदान करण्यात आल्या. विविध विद्याशाखेतील ३३२ संशोधकांना आचार्य पदवी (पी.एचडी.) कुलपतींच्या हस्ते बहाल करण्यात आली.

कुलगुरू डॉ. श.नू. पठाण आणि प्र-कुलगुरू डॉ. गौरीशंकर पाराशर, कुलसचिव सुभाष बेलसरे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यावेळी उपस्थित होते. डॉ. जाधव म्हणाले, बालपणी पारंपरिक बडबडगीते शाळेत शिकविली जातात. मात्र, या बडबडगीतांची फलश्रुती करण्याचा प्रयत्न झाल्यास काहीएक साध्य होणार नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रगतीचा वेध तरुणांनी घेतला पाहिजे.

विदेशात आयटी हब म्हणून भारताची गणना होते. आमच्या तरुणांनी विदेशात प्रगतीचे झेंडेही रोवले; मात्र देशाच्या विकासात त्यांचा वाटा काय? यावर मंथन होणे गरजेचे आहे. गुणवत्ता शिक्षणाच्या बाता सर्वत्र होत असल्या तरी ४१७ पैकी केवळ १४० विद्यापीठांना नॅकचे 'अ' मानांकन आहे. अनेक विद्यापीठ आणि महाविद्यालयात शिक्षक नाही. संशोधनाचा प्रवाह मंद आहे. यालाच गुणवत्ता शिक्षण म्हणायचे का? असा सवाल जाधव यांनी केला. सुपर पॉवर गुणवत्ता शिक्षणासाठी शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ११ व्या पंचवार्षिक योजनेत याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे जाधव म्हणाले.

पुण्यनगरी
२६/७/०९

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Lokmat

Dated: 26/7/2009

# नियोजन आयोगाद्वारे विदर्भाला न्याय दिला जाईल

■ आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांचे आश्वासन
■ भारतीय अर्थव्यवस्था जगातील दुसरी सर्वात जलद वाढणारी अर्थव्यवस्था

नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी) - भारतीय अर्थव्यवस्था तीन सकारात्मक व तीन नकारात्मक दिशेने पुढे जात आहे. या नकारात्मकतेमध्ये कृषी क्षेत्राकडे दिले जाणारे अक्षम्य दुर्लक्ष महत्त्वाचा भाग असून, विदर्भातील आत्महत्यांचे तेच मूळ आहे. त्यामुळे राष्ट्रीय हितास बाधा पोहोचू न देता केंद्रीय नियोजन आयोगांतर्गत विदर्भाला जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन आयोगाचे सदस्य व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिले.

विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनतर्फे (व्हीआयए) 'कृषी क्षेत्राच्या विकासासह विदर्भाचा विकास' या विषयावर डॉ. जाधव यांचे आज व्याख्यान झाले.यावेळी व्हीआयएचे अध्यक्ष प्रवीण तापडिया, कृषी व ग्रामीण सेलचे अध्यक्ष सुरेश अग्रवाल, आशित सिन्हा, संयोजक स्मिता दाभोळकर आदी उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले की, १९८५ मध्ये लोकसंख्येचा दर २.२ व विकास दर ३.५ टक्के होता.त्यानुसार दरडोई उत्पन्न दुप्पट करण्यासाठी ५९ वर्षे लागणार होती. मात्र, धोरणात्मक बदलांमुळे १९९२ ते २००२ ६ टक्के, २००२ ते २००५ ८ टक्के व त्यानंतर हा दर ९ टक्के झाला आहे. १९८५ मध्ये ४४ टक्के असलेली दारिद्र्य रेषेखालील टक्केवारी आता २८ टक्क्यांवर आली आहे. १९९१ मध्ये आपला परकीय चलन साठा केवळ १ अब्ज डॉलर होता; तो आता ३०० अब्ज डॉलरहून अधिक झाला आहे. आयएमएफकडून घेतलेले कर्ज आपण १९९७ मध्येच परत केले असून, मागील तीन वर्षांपासून आपण आयएमएफला कर्ज देत आहोत.

नकारात्मक बाबींमध्ये विकासाची फळे चाखणारे व विकासाची फळे चाखू न शकणाऱ्यांमधील दरी दिवसेंदिवस वाढत असून, त्यामुळे रोजगारनिर्मितीही कमी झाली आहे, याचा प्रामुख्याने समावेश होतो. त्याशिवाय विकास दरात शिक्षण क्षेत्रासाठी ६ टक्के तरतूद करण्याचे लक्ष्य होते. मात्र, मागील ४२ वर्षांत आपण ४ टक्क्यांचे पुढे तरतूद केलेलीच नाही. कृषी क्षेत्रातील सिंचन प्रमाणाची समस्या भीषण आहे. देशाच्या पातळीवर हे प्रमाण ३५ टक्के, राज्य पातळीवर फक्त १७ टक्के व विदर्भ स्तरावर ११ टक्क्यांपेक्षाही कमी आहे, असे ते म्हणाले.

डॉ. जाधव यांनी सांगितले की, १९४५ ते २००० दरम्यान अमेरिका, पश्चिम युरोप व जपान हे तिघे जागतिक अर्थव्यवस्थेचे इंजिन चालक होते. मात्र त्यानंतर परिस्थिती बदलली. सुरुवातीला जपान व नंतर अमेरिकेला अर्थव्यवस्थेत फटका बसला. अशावेळी पश्चिम युरोपही जग सांभाळू शकले नाही व मागील दहा वर्षांत चीन आणि भारत यांनी जागतिक अर्थव्यवस्थेची धुरा सांभाळली. त्यामध्ये भारतीय अर्थव्यवस्था जगातील दुसरी सर्वात जलद वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. स्वागत भाषणात सुरेश अग्रवाल म्हणाले की, विदर्भातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न दुप्पट करण्याचा आमचा उद्देश आहे. त्यासाठी डॉ. जाधव यांच्या मदतीची आम्हाला अपेक्षा आहे. कार्यक्रमाचे संचालन संयुक्त सचिव गिरीश देवधर यांनी केले. यावेळी एमबीए विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ११ व्या पंचवार्षिक योजनेची प्रगती असमाधानकारक

२०११ मध्ये संपणाऱ्या ११ व्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी असमाधानकारक असून, त्याचा अभ्यास करण्यासाठी मध्यावधी आराखडा तयार केला जात असल्याचे डॉ. जाधव यांनी रविभवनात पत्रकारांना सांगितले. ते म्हणाले, ११ व्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाला महत्त्व दिले असून, देश या क्षेत्रात निर्णायक स्तरावर आहे. मात्र, १८ ते २३ वयोगटातील विद्यार्थ्यांमधील उच्चशिक्षणाचे प्रमाण फक्त ११ टक्के आहे. हेच प्रमाण अमेरिकेत ८३ टक्के आहे. अशावेळी खरोखर सुपर पॉवर व्हायचे असल्यास याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी येत्या डिसेंबरपर्यंत या योजनेचा आराखडा सादर केला जाणार आहे. त्याचे प्रतिबिंब २०१०-११ च्या अर्थसंकल्पात दिसणे अपेक्षित आहे. ते दिसल्यास २०१२ पासून सुरू होणाऱ्या १२ व्या पंचवार्षिक योजनेचा पथदर्शी अहवालही लवकरच तयार होऊ शकेल. मंदीबाबत डॉ. जाधव म्हणाले की, भारतात मंदी नाही. मुख्यत: सलग दोन तिमाहींमध्ये विकास दर नकारात्मक झाल्यास मंदी येते. भारतात तसे काहीच नसून उद्योजकांनी मागितलेले पॅकेज हा केवळ एक बनाव आहे. भारतात जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती हा काहीसा मंदीचा परिणाम असला तरी, सुमारे दीड वर्षांत त्या नियंत्रणात येतील.

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Lokmat

Dated: 26/7/09

# प्रतिभेच्या बळावर जग जिंका - डॉ. जाधव

## नागपूर विद्यापीठाचा ९६ वा दीक्षांत समारंभ

नागपूर, दि. २५ (प्रतिनिधी) - 'येरे येरे पावसा' म्हटल्याने पाऊस कधीच पडत नाही आणि पडणार नाही ! पावसाला खोटा पैसा देण्याचे आश्वासन देणारे बडबडगीत गात बसाल तर देशाला सुपर पॉवर होण्यासाठी शतके लागतील. प्रगल्भ इच्छाशक्तीच्या बळावर जग जिंकण्याचा मंत्र नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी तरुणाईला दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ९६ वा दीक्षांत समारंभ शनिवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. डॉ. जाधव यांनी यशाची अष्टसूत्री विद्यार्थ्यांना यावेळी सांगितली.

विद्यापीठाचे कुलपती आणि राज्यपाल एस.सी. जमीर यांच्या हस्ते २००८ च्या परीक्षेतील ५७ हजार ७२ विद्यार्थ्यांना स्नातक आणि स्नातकोत्तर पदव्या यावेळी प्रदान करण्यात आल्या.

विविध विद्याशाखेतील ३३२ संशोधकांना आचार्य पदवी (पी.एचडी.) कुलपतींच्या हस्ते बहाल करण्यात आली.

कुलगुरू डॉ. श.नू. पठाण आणि प्र-कुलगुरू डॉ. गौरीशंकर पाराशर, कुलसचिव सुभाष बेलसरे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यावेळी उपस्थित होते. डॉ. जाधव म्हणाले, बालपणी पारंपरिक बडबडगीते शाळेत शिकविली जातात. मात्र, या बडबडगीतांची फलश्रुती करण्याचा प्रयत्न झाल्यास काहीएक साध्य होणार नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रगतीचा वेध तरुणांनी घेतला पाहिजे.

विदेशात आयटी हब म्हणून भारताची गणना होते. आमच्या तरुणांनी विदेशात प्रगतीचे झेंडेही रोवले; मात्र देशाच्या विकासात त्यांचा वाटा काय? यावर मंथन होणे गरजेचे आहे.गुणवत्ता शिक्षणाच्या बाता सर्वत्र होत असल्या तरी ४१७ पैकी केवळ १४० विद्यापीठांना नॅकचे 'अ' मानांकन आहे. अनेक विद्यापीठ आणि महाविद्यालयात शिक्षक नाही. संशोधनाचा प्रवाह मंद आहे. यालाच गुणवत्ता शिक्षण म्हणायचे का? असा सवाल जाधव यांनी केला.

सुपर पॉवर गुणवत्ता शिक्षणासाठी शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ११ व्या पंचवार्षिक योजनेत याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे जाधव म्हणाले.बदलत्या नागपूरचा ध्यास घेत विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा संकल्प कुलगुरू डॉ. पठाण यांनी केला.

यंदापासून कॅम्पसमध्ये 'मॉलिक्युलर बायोलॉजी अ‍ॅन्ड जेनेटिक इंजिनियरिंग' हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. यासोबतच भौतिकशास्त्र विभागात पदव्युत्तरस्तरावर नॅनो टेक्नॉलॉजी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. पठाण यांनी दिली.




विधी स्नातक परीक्षेत सर्वाधिक पुरस्कार पटकाविणारी सपना तिरपुडे हिचा गौरव करताना राज्यपाल एस. सी. जमीर. सोबत नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव आणि कुलगुरू डॉ. श. नू. पठाण. (वृत्त पान २ वर)